दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक १२६ वा शुक्रवार दि.०६ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा आढावा

नवी दिल्ली, दि. ५ – राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालये, महापालिका व नगरपालिकांची रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारितील रुग्णालयांना तात्काळ भेट देऊन पाहणी करावी, आणि सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. महत्त्वाच्या बैठकांसाठी आज सकाळी नवी दिल्ली येथे आलेल्या मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधून राज्यातील आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. यापुढे जिल्हाधिकाऱ्यांनी नियमितपणे शासकीय रुग्णालयांना भेटी देण्याच्या स्पष्ट सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. नवी दिल्ली येथून दूरदृश्यप्रणालीद्वारे घेतलेल्या या बैठकीला मुख्य सचिव मनोज सौनिक, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांचेसह आरोग्य, वैद्यकीय शिक्षण विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि राज्यातील सर्व जिल्हाधिकारी उपस्थित होते. नांदेड आणि घाटी येथील रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमण्यात आली असून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही श्री. शिंदे यांनी यावेळी दिला. औषध खरेदीचे जिल्हाधिकाऱ्यांनाही अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे औषध खरेदीत विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्य सरकारचे आरोग्य व्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य आहे. आरोग्य व्यवस्थेच्या



बळकटीकरणासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन आराखडा तयार करण्याचे काम राज्य सरकार करत असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाहीही श्री. शिंदे यांनी यावेळी दिली. यापुढे जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेची जबाबदारी ही आपली मानून दररोज जिल्ह्यातील वेगवेगळ्या सरकारी रुग्णालयांना भेट देऊन सातत्याने आढावा घ्यावा आणि तातडीने योग्य ती पावले उचलण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, रुग्णालयांचे अधिष्ठाता आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनी एक टीम म्हणून आरोग्ययंत्रणेचे काम करावे, आवश्यक निधी आणि अतिरिक्त साधनसामुग्रीची मागणी आल्यास ती तात्काळ पुरविण्यात यावी. मनुष्यबळ कमी असल्यास आउटसोर्सिंग करण्याचे अधिकारही जिल्हास्तरावर देण्यात आलेले आहेत, त्यामुळे राज्यातील जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा देण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना साधनसामुग्री, मनुष्यबळाअभावी विलंब झाल्यास संबंधितांना जबाबदार धरून कारवाई करण्यात येईल आणि औषधे, मनुष्यबळाची कमतरता ही कारणे खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारही मुख्यमंत्र्यांनी दिला. औषधांच्या उपलब्धतेबाबत राज्यस्तरीय डॅशबोर्ड आहे, त्याचा प्रभावी वापर सर्व रुग्णालयांनी करावा, जेणेकरून तातडीने आवश्यक औषधांची खरेदी करणे शक्य होईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांना अग्रीम रक्कम कधी देणार ?आमदार धिरज देशमुख यांचा सवाल; नकार दर्शविणाऱ्या पीकविमा कंपन्यांवर सरकारने कडक कारवाई करावी

लातूर : शेतकऱ्यांना २५ टक्के आगाऊ पीकविमा वितरित करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी देवून दीड महिना झाला तरी पीकविमा कंपन्यांनी अद्याप लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आगाऊ पीकविमा दिला नाही. चालढकल करणाऱ्या, नकार दर्शवणाऱ्या कंपन्यांवर सरकारने कारवाई करावी, अशी मागणी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी गुरुवारी केली. जून महिन्यात पाऊस नसल्याने यंदा पेरण्यांना उशीर झाला. जुलै महिन्यात सुरवातीचे दोनच आठवडे पाऊस झाला. त्यानंतर पाऊस झाला नाही. त्यातच ऑगस्ट महिन्याचे सुरवातीचे दोन–तीन आठवडे कोरडे गेले. त्यामुळे पावसात सलग खंड पडल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले. पावसात सलग खंड पडल्याने आणि उत्पादनात मोठी घट होणार असल्याने पीकविमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना विमा भरपाईच्या २५ टक्के रक्कम अग्रीम मिळाली पाहिजे, असे पत्र आमदार श्री. धिरज देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांना २१ ऑगस्ट रोजी दिले होते. त्यानंतर त्यांनी तातडीने बैठक घेवून पीकविमा कंपन्यांना तशा सूचना दिल्या. मात्र, दीड महिना उलटून गेला तरी पीक विमा कंपन्यांनी अद्याप पीकविमा वितरीत केला नाही. या पार्श्वभूमीवर, आमदार श्री. धिरज



देशमुख यांनी पीकविमा शेतकऱ्यांना तातडीने द्यावा. तो वितरीत करण्याबाबत टाळाटाळ करणाऱ्या, नकार दर्शवणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सरकारकडे केली.

---ऐन उत्सवाच्या काळात शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू

शेतकरी बांधवांवर सातत्याने संकटे कोसळत आहेत. त्यामुळे शेतकरी बांधव मेटाकुटीला आला आहे. कृषी संस्कृतीशी निगडित असलेल्या पोळा, राखीपौर्णिमा, गणेशोत्सव व गौरी अशा उत्सवाच्या काळात तरी संवेदनशीलता दाखवून शेतकऱ्यांना अग्रीम रक्कम देवून मदत करणे गरजेचे होते. पण, मदत न मिळाल्याने ऐन उत्सवाच्या काळात शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू पहायला मिळाले. त्यामुळे आता शेतकऱ्यांसाठी दसरा तरी गोड व्हावा, अशी भावना आमदार श्री. धिरज देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली.

## सामूहिक दसरा समितीची उद्या आर्य समाज येथे व्यापक बैठक

लातूर दि.५:– लातूरच्या सामुदायिक दसरा महोत्सवाचे यंदा ५१ व्या वर्षात पदार्पण झाले असून, त्यानिमित्ताने यंदाचा दसरा महोत्सव येत्या विजयादशमी दिनी उत्साहपूर्ण वातावरणात आणि भव्यदिव्य स्वरुपात साजरा होणार आहे. लातूरकरांच्या यंदाच्या या पारंपारिक दसरा महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी उद्या शनिवारी ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महोत्सवाचे स्वागताध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी येथे दिली.



लातूर येथील आर्य समाज (गांधी चौक) येथे शनिवारी सायंकाळी आयोजिण्यात आलेल्या या बैठकीस समिती सदस्यांसह सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही आ. कराड यांनी केले. बैठकीस उपस्थित राहून नागरिकांनी व सदस्यांनी केलेल्या सूचनांचे स्वागतच करण्यात येणार असून, बैठकीस सर्वांनीच उपस्थित राहण्याचे आवाहन महोत्सव समितीचे अध्यक्ष ईश्वर बाहेती, ग्रामीण अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, कार्याध्यक्ष जयप्रकाश दगडे, मुख्य संयोजक श्रीकांत रांजणकर व संतोष तोष्णीवाल, उपाध्यक्ष व पतंजली योग समितीचे विष्णु भुतडा, वैजनाथप्पा लातुरे, सरचिटणीस व्यंकटेश हालिंगे, महिला प्रमुख ॲड. राणीताई स्वामी, युवक अध्यक्ष आकाश गडगडे, ॲड. गोपाळ बुरबुरे, युवा संयोजक अजयसिंग राठोड आदींनी केले आहे.




## संपादकीय....

# गच्छंती मॅकार्थीची, फजिती अमेरिकेची!

अमेरिकेच्या इतिहासात आजवर कधीही प्रतिनिधिगृहाच्या सभापतीविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल होऊन तो मंजूर झालेला नाही. अत्यंत गंभीर मुद्द्यांवर पक्षातीत विचारविनिमय होऊन मतैक्य घडून यावे आणि आर्थिक पेच टळावा, यासाठी प्रयत्न केल्याबद्दल एखाद्या मोठ्या लोकशाही देशातील सभागृह नेत्याचीच हकालपट्टी होते, तेव्हा ते सभागृहच नव्हे तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच विकारग्रस्त झाली आहे असे खुशाल समजावे. अशा प्रकारे एखाद्या पीठासीन अधिकाऱ्याची हकालपट्टी जेव्हा अमेरिकेसारख्या देशामध्ये होते, तेव्हा त्याचे परिणाम अमेरिकेपलीकडेही जाणवणारे असतात. अमेरिकी काँग्रेसमधील प्रतिनिधिगृहाचे सभापती केव्हिन मॅकार्थी यांना त्यांच्याच पक्षाच्या काही प्रतिनिधींनी पुढाकार घेऊन पदच्युत केले. मॅकार्थी हे रिपब्लिकन पक्षातले आदर्श नामदार नव्हेत. पण अमेरिकी प्रशासनासाठी नियत कर्जमर्यादा वाढवण्याचा मुद्दा असो वा अगदी अलीकडचा सरकारी कामकाज खर्चमंजुरीअभावी ठप्प पडण्याची संभाव्यता असो, मॅकार्थी यांना प्रतिनिधिगृहातील डेमोक्रॅट्स सदस्यांची मदत घ्यावी लागली आणि अनेकदा त्यासाठी अमेरिकेचे डेमोक्रॅटिक अध्यक्ष जो बायडेन यांच्याशी मसलतही करावी लागली. याचेच भांडवल रिपब्लिकन पक्षातील अतिउजव्या विचारसरणीचे प्रतिनिधी मॅट गेट्झ यांनी केले. वास्तविक दोन्ही पेचप्रसंगांमध्ये मॅकार्थी यांनी पक्षनिष्ठेऐवजी व्यावहारिक शहाणपणाला प्राधान्य दिले. शिवाय परवा त्यांनी खर्चमंजुरीविषयी तडजोड घडवून आणली, ती तात्पुरत्या स्वरूपाचीच आहे. म्हणजे नोव्हेंबर मध्यापर्यंत खर्चास मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर पुन्हा एकदा सभागृहात खर्चाबाबत नव्या तरतुदींना मंजुरी द्यावी लागेल. पण गंमत अशी, यासाठी डेमोक्रॅट्स सदस्यांबरोबर वाटाघाटी करेल अशी व्यक्ती– म्हणजे सभापती– कोण, हे अद्याप निश्चित झालेले नाही. म्हणजे गेट्झ यांच्यासह रिपब्लिकन पक्षाच्या ज्या आठ सदस्यांनी मॅकार्थी यांच्या गच्छंतीसाठी रान उठवले आणि अखेरीस आपले उद्दिष्ट साध्य केले त्यांच्याकडे मॅकार्थींना पर्यायी नाव उपलब्ध नाही. अमेरिकेच्या कलुषित आणि दुभंगलेल्या राजकीय हवेचे ताजी घटना ठसठशीत निदर्शक आहे.जे काही घडले, ते अभूतपूर्व आहे. अमेरिकेच्या इतिहासात आज–वर कधीही प्रतिनिधिगृहाच्या सभापतीविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल होऊन तो मंजूर झालेला नाही. पण गेल्या काही वर्षांमध्ये विशेषत: रिपब्लिकन नेत्यांच्या बाबतीत 'अभूतपूर्व' वगैरे काही शिल्लक राहिलेले नाही. कारण पक्षस्वार्थापलीकडे देशहित किंवा लोकशाहीच्या हिताकडे पाहण्याची अमेरिकेतील संस्कृती या मंडळींनी कधीच मोडून टाकली आहे. या नव्या विचारसरणीचे निर्माते आणि आश्रयदाते आहेत अर्थातच डोनाल्ड ट्रम्प. ट्रम्प यांच्यानुसार टोकाचे राजकारण केले, तर आणि तरच आपल्याला काही भवितव्य आहे, असे वाटणाऱ्यांची संख्या रिपब्लिकन पक्षात वाढू लागली आहे. किंबहुना ट्रम्प हेच आता अध्यक्षीय निवडणूक जिंकण्यास सक्षम उमेदवार पक्षात उरलेले आहेत, हा प्रचार बहुतांना खरा वाटू लागला आहे. अमेरिकेची उदात्त आणि समावेशक लोकशाही व्यवस्था, स्थलांतरितांचे त्या देशाच्या उत्थ–ानातील योगदान, जगातील सर्वात सक्षम अर्थव्यवस्था आणि सर्वशक्तिमान लष्करी सत्ता असल्याबद्दल येणाऱ्या जबाबदाऱ्या यांविषयी काडीचाही रस नसलेल्या आणि निव्वळ उद्दाम सत्ताकारणातच गती आणि मती असलेल्या काही टवाळांनी मॅकार्थी यांना त्यांनी केलेल्या तडजोडींबद्दल नको जीव करून सोडले होते. एका अर्थी मॅकार्थी हे स्वत:च या चक्रव्यूहात अडकत गेले. सर्वसंमती या मूल्याशी पूर्णत: प्रतारणा घेतलेल्या नि 'हाऊस फ्रीडम कॉकस' नामे गट म्हणून वावरणाऱ्या गेट्झ यांच्यासारख्या रिपब्लिकन सदस्यांमुळे मॅकार्थी यांची सभापतीपदी निवडही जिकिरीची ठरली होती. रिपब्लिकन बहुमत असलेल्या सभागृहात, रिपब्लिकनच सभापती निवडण्यासाठी १५ फेऱ्या घेतल्या गेल्या. अखेर मॅकार्थी यांच्या नावावर काही तडजोडींनंतर शिक्कामोर्तब झाले. यांतील एक तडजोड म्हणजे, कोणत्याही सदस्याला कोणत्याही मुद्द्यावर मॅकार्थी यांच्या हकालपट्टीसाठी मतदानाची मागणी करण्याची मुभा! अखेर ही तरतूदच मॅकार्थी यांच्या पतनास कारणीभूत ठरली. यांतून काही रिपब्लिकन सदस्यांचे समाधान झाले, पण देश अडचणीत येण्याची शक्यता आहे. खर्चमंजुरीची मुदत नोव्हेंबरच्या मध्यावर संपुष्टात येईल. त्यापूर्वी नवीन सभापती नियुक्त व्हावा लागेल. परंतु अमेरिकेमध्ये तिसऱ्या सर्वात प्रभावी प्रशासकीय पदावरील– अध्यक्ष, उपाध्यक्ष व सेनेट सभापती यांच्यानंतर– व्यक्तीची ज्या प्रकारे हकालपट्टी पाहता रिपब्लिकन पक्षातीलच फार कोणी या पदावर काम करू धजणार नाही. बहुसंख्य रिपब्लिकनांनी मॅकार्थी यांच्या बाजूने मतदान केले, परंतु त्यांचा आ–वाज कडव्या मोजक्यांच्या तुलनेत क्षीण आहे. त्यांना जशी ट्रम्प संस्कृती मोडून काढता आली नाही, तशीच या संस्कृतीची नवी पिलावळही सहन करावी लागेल. मॅकार्थी यांची गच्छंती ही अमेरिकी राजकारणाची फजिती ठरते. तिची किती किंमत त्या देशाला आणि जगाला मोजावी लागेल, याचा हिशेब अजूनही करता येत नाही.

# माहिती नको, आकडेवारी द्या..

पंतप्रधान सनातन धर्मावर होणाऱ्या हल्ल्यांबद्दल बोलत आहेत, तर सरसंघचालक धर्मांतरे आणि लव्ह जिहादचा आक्रमक प्रतिकार करण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन करत आहेत. या गोष्टी होत असतील तर त्या तुम्हाला तुमच्या आसपास दिसत आहेत का? पंतप्रधान, सरसंघचालक त्याबद्दलचे नुसते उल्लेख का करतात? तपशील का देत नाहीत? पी. चिदम्बरम समजा की इंग्रजी भाषेच्या एखाद्या शिक्षिकेला तिच्या वर्गाला 'हायपरबोल' हा शब्द समजावून सांगायचा आहे. त्यासाठी ती एखाद्या उदाहरणाच्या शोधात असेल तर रिझव्ह बँकेच्या सप्टेंबर २०२३ च्या वार्तापत्रातील असलेल्या एका वाक्यापेक्षा चांगले उदाहरण शोधूनही सापडणार नाही. ते वाक्य असे होते की, 'सप्टेंबर २०२३ मध्ये, पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण केंद्र भारतात हलवले गेले होते. कारण जगातील सर्वात शक्तिशाली देशांचे नेते, अधिकारीवर्ग आणि आंतरराष्ट्रीय संघटना नवी दिल्लीत एकत्र आल्या होत्या.'




रिझव्ह बँकेच्या मते, पृथ्वीचे गुरुत्व केंद्र रोममधून (२०२१) बाली (२०२२) येथे आले. तिथून ते नवी दिल्ली (२०२३) मध्ये आले आणि नवी दिल्लीमधून ते २०२४ मध्ये रिओ दि जानेरो येथे स्थलांतरित होईल. सप्टेंबर २०२३ मध्ये हे गुरुत्वाकर्षण केंद्र नवी दिल्ली येथे आल्यामुळे आपल्याला हादरे जाणवले. मणिपूरमधला संघर्ष ३ मे २०२३ रोजी सुरू झाला आणि मणिपूर अजूनही जळत आहे; काश्मीरमध्ये वारंवार दहशतवादी हल्ले होत आहेत; भूस्खलन आणि पुरामुळे हिमाचल प्रदेश आणि इतर काही राज्ये उद्ध्वस्त झाली आहेत; आणि तमिळनाडूमध्ये एआयएडीएमकेने भाजपबरोबरची युती जवळपास तोडल्यात जमा आहे.जुमला परेड गुरुत्वाकर्षणाचे केंद्रच बदलल्यामुळे आपल्याला आता आणखी घोषणा आणि कार्यक्रमांची अपेक्षा आहे. २०–२१ सप्टेंबर रोजी महिला आरक्षण जुमला विधेयक संसदेत मंजूर झाले. २०१९ नंतर होणाऱ्या निवडणुकांमध्ये त्याची अंमलबजावणी होऊ शकते. एक देश, एक निवडणूक आणि समान नागरी संहिता हे होऊ घातलेले आणखी दोन जुमले आहेत. एक देश एक निवडणूक योजना (कोविंद समिती विरुद्ध कायदा आयोग) आणि समान नागरी कायदा मसुदा (उत्तराखंड वि. आसाम विरुद्ध मध्य प्रदेश) यांच्यामध्ये कोण आधी यासाठी जोरदार स्पर्धा आहे.दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी 'धर्मांतर' आणि 'लव्ह जिहाद'च्या वाढत्या घटनांबद्दल चिंता व्यक्त केली आहे आणि संघाच्या कार्यकर्त्यांना या दोन्ही मुद्द्यांना 'आक्रमक'पणे तोंड देण्यास सांगितले आहे. म्हणजे काय करा, तर थोडक्यात सांगायचे म्हणजे चर्च, धर्मगुरू, मिशनरी आणि ख्रिश्चन प्रार्थना सभांवरील हल्ल्यांसाठी तयारीला लागा. आंतरधर्मीय विवाह करू इच्छिणाऱ्या आणि एकमेकांवर विश्वास असलेल्या तरुण जोडप्यांनी हिंदू मुलींच्या 'सन्माना'चे रक्षण करणे हे आपले नैतिक–धार्मिक कर्तव्य मानणाऱ्या फलटणींपासून सावध राहावे. (असे असेल तर मग अहिंदू मुलींच्या 'तावडी'त सापडलेल्या हिंदू मुलांच्या 'अब्रू'चे रक्षण कोण करणार, असा मला प्रश्न पडला आहे.)पुरावे आहेत? धर्मांतर आणि लव्ह जिहादबाबतच्या या निराधार आरोपांनी खरे तर मी थक्कच झालो. चर्चकडून चालवल्या जाणाऱ्या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये हजारो विद्यार्थी शिकतात. या शिक्षणसंस्था उत्तम पद्धतीने चालवल्या जातात. तिथे शिकणाऱ्या या मुलांना खरे तर विचारले पाहिजे की त्यांच्यापैकी किती जणांचा असा अनुभव आहे की ते शिकत असलेल्या शिक्षणसंस्थांपैकी किती संस्था आपल्या या ख्रिश्चनेतर विद्यार्थ्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारावा, धर्मांतर करावे, यासाठी प्रयत्न करतात? आपल्यापैकी प्रत्येकाने एकदा स्वत:लाच विचारून बघावे की आपल्या शहरात किंवा गावात गेल्या वर्षभरात किती आंतरधर्मीय विवाह झाले आहेत? इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती एकदा जाहीरपणे म्हणाले होते, ''माझा देवावर विश्वास आहे; पण तेवढे वगळता बाकी सगळ्या गोष्टींसाठी मला आकडेवारी द्या.''सरसंघचालक आपल्याला धर्मांतर आणि लव्ह जिहा–दची आकडेवारी देतील? आपले पंतप्रधानही सध्या मैदानात उतरले आहेत. सनातन धर्मावर हल्ले होत आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांनी संघाच्या शस्त्रागारातून 'धर्मांतर' आणि 'लव्ह जिहाद' ही शस्त्रे उचलली आहेत. महिला आरक्षण विधेयक ही पंतप्रधानांनी जनतेला दिलेली 'भेट' असे यापुढे सतत सांगितले जाईल (प्रत्यक्षात, तो बुडत्या बँकेचा पोस्ट–डेटेड चेक आहे). भारत विश्वगुरू असल्याचे पटवून देण्यासाठी जी–ट्वेंटी परिषदेचे व्हिडीओ आणि छायाचित्रे समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित केली जातील.ऐक्य आणि अजेंडा दुसरीकडे इंडिया आघाडीतील पक्ष आणि त्यांचे नेते त्यांना महत्त्वाचे वाटणारे, सामान्य लोकांच्या जीवनावर परिणाम करणारे आजच्या घडीचे महत्त्वाचे मुद्दे उचलून धरण्याची तयारी करत आहेत.

त्यात महागाई, बेरोजगारी, वांशिक आणि धार्मिक संघर्ष, द्वेषयुक्त भाषणे आणि गुन्हे, व्यक्ती तसेच भाषणस्वातंत्र्यावर अंकुश, राज्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण, संघराज्याची झीज, राज्यघटनेवर हल्ले, न्यायालयांचे महत्त्व कमी करणे, चिनी घुसखोरी, दहशतवादी घटना, मंदावलेली आर्थिक वाढ, वाढती असमानता, छुपी भांडवलशाही, कल्याणकारी योजनांमध्ये घट, राष्ट्रीय कर्जात वाढ, तपास यंत्रणांचा गैरवापर, संसदीय संस्थांचे महत्त्व कमी लेखणे, केंद्रीकरणावर तसेच व्यक्तिमाहात्म्य वाढवण्यावर जोर देणे या मुद्द्यांचा समावेश आहे. पैसा, ताकद आणि कायद्याचा गैरवापर करून आपण विरोधकांना नामोहरम करू असे भाजपला वाटते आहे.देशाचे आर्थिक व्यवस्थापन चुकीच्या पद्धतीने होते आहे आणि अर्थव्यवस्था संकटात आहे, हे आरोप पडताळून पाहू या. बेरोजगारी: ऑगस्ट २०२३ मध्ये बेरोजगारीचा दर ८.१ टक्के होता. २०२२ मध्ये बेरोजगार तरुणांची संख्या (१५–२४ वयोगट) २३.२२ टक्के होती. 'स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३'च्या अहवालानुसार पदवीधरांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण ४२ टक्के आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये, एक कोटी ९१ लाख ६० हजार कुटुंबांनी मनरेगाअंतर्गत रोजगाराची मागणी केली. किमती आणि महागाई: रिझव्ह बँकेच्या मासिक वार्तापत्रानुसार, २३ ऑगस्ट रोजी ग्राहक किंमत निर्देशांक ६.८ टक्के, इंधन आणि वीज महागाई ४.३ टक्के आणि अन्नधान्य महागाई ९.२ टक्के होती. फेब्रुवारी २०२२ पासून, ग्राहक किंमत निर्देशांक सहा टक्क्यांपेक्षा जास्त आहे.गृहवित्त: सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या टक्केवारीनुसार गृहवित्त मालमत्ता २०२०–२१ मध्ये १५.४ टक्के होती. ती २०२२–२३ मध्ये १०.९ टक्क्यांवर घसर–ली. याच कालावधीत, गृहवित्त कर्ज ३.९ टक्क्यांवरून ५.८ टक्क्यांपर्यंत वाढले. तर निव्वळ आर्थिक मालमत्ता ११.५ टक्क्यांवरून ५.१ टक्क्यांवर घसरली. लोककेंद्रित तीन सर्वोच्च चाचण्यांमध्ये मोदी सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. १९७७ पासून आत्तापर्यंत युद्धाच्या सीमारेषा कधी नव्हे इतक्या तीव्रपणे आखल्या गेल्या आहेत.

# सरधोपट मांडणीत अडकलेली रंजक कथा

'द व्हॅक्सिन वॉर' हा विवेक अग्निहोत्री दिग्दर्शित चित्रपट दोन गोष्टींसाठी फार महत्त्वाचा ठरतो. कोविडकाळात संपूर्ण देश एका भयंकर मानसिक उद्वेगातून जात असताना आपण आपल्या लोकांना वाचवण्यासाठी काय करू शकतो? रेश्मा राईकवार 'द व्हॅक्सिन वॉर' हा विवेक अग्निहोत्री दिग्दर्शित चित्रपट दोन गोष्टींसाठी फार महत्त्वाचा ठरतो. कोविडकाळात संपूर्ण देश एका भयंकर मानसिक उद्वेगातून जात असताना आपण आपल्या लोकांना वाचवण्यासाठी काय करू शकतो? हा विचार इथल्या शास्त्रज्ञांनी सुरू केला. करोनाचं थैमान थोपवण्यासाठी टाळेबंदीचा निर्णय घेण्यापासून ते या विषाणूवर जालीम उपाय म्हणून आपल्या देशात लसनिर्मिती करायचीच हा विडा उचलत त्यासाठी दिव–सरात्र एक करणारे हे शास्त्रज्ञ सुपरहिरोंपेक्षा कमी नाहीत. त्यांच्या प्रयत्नांची गाथा सांगताना या शास्त्रज्ञांमध्ये ७० टक्के स्त्रिया होत्या हे ठळकपणे दिग्दर्शकाने मांडले आहे. वास्तव शैलीचा आधार घेत यातले नाट्य रंजकतेने प्रेक्षकांसमोर मांडण्यात मात्र विवेक अग्निहोत्रींना यश आलेले नाही. माहितीपटाच्या साच्यातील हा चित्रपट काहीशा सावधपणे प्रचारकी थाटात सरकारचे गुण–गान गातो हेही लपलेले नाही. 'द व्हॅक्सिन वॉर' हा चित्रपट 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च'चे (आयसीएमआर) माजी संचालक डॉ. बलराम भार्गव यांच्या 'गोइंग व्हायरल' या पुस्तकावर आधारित आहे. त्यामुळेच की काय दिग्दर्शकाच्या मांडणीवरही हा पुस्तकी प्रभाव जाणवतो. चीनमध्ये करोनाचा पहिला रुग्ण सापडला इथपासून 'आयसीएमआर'च्या संशोधकांमध्ये सुरू झालेली चर्चा, आपल्याकडे करोनाचा कितपत प्रभाव आहे याची चाचपणी, इराणमध्ये अडकलेल्या भारतीयांना मायदेशात आणल्यानंतर त्यांची करोना चाचणी करण्यासाठी डॉक्टरांचे पथक नसणे, पुरेशा सोई नसणे, पीपीई किट उपलब्ध नसणे अशा पूर्ण नकारात्मक परिस्थितीतून आत्मनिर्भर होण्यापर्यंत झालेली वाटचाल हा ढोबळमानाने घडत गेलेला प्रवास या चित्रपटात पाहायला मिळतो. करोनाचा हा अवघड काळ अनेकांना आजही विसरता येणं शक्य नाही. अनेकांना तर त्या काळातील आठवणी, करोनाचा साधा उल्लेखही निराशाजनक वाटतो. अशा परिस्थितीत त्या काळात घडलेल्या भयंकर परिस्थितीच्या आठवणींनी ताण येणार नाही याचे भान राखत केवळ लसनिर्मितीचे प्रयत्न आणि त्या अनुषंगाने आलेल्या अडचणींवर प्रकाश टाकण्याचा दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांचा प्रयत्न नक्कीच दखल घेण्याजोगा आहे.

मुळात सरकारी संस्था आणि त्यांचा कारभार आला की साहजिकच सरकारची ध्येयधोरणं, त्याचा प्रभाव, त्या काळात घेतलेले निर्णय या सगळ्या गोष्टींचा उल्लेख होणं स्वाभाविक आहे. बहुधा 'द काश्मीर फाइल्स' चित्रपटाच्या वेळी झालेली टीका लक्षात घेत इथे थेट पंतप्रधान मोदींचा उल्लेख टाळण्यात आला आहे. सरकारच्या निर्णयांची बाजू इथे एका कॅबिनेट सचिवाच्या माध्यमातून मांडण्यात आली असली तरी त्यातला प्रचारकीपणा किंवा दिग्दर्शकाची वैयक्तिक समर्थक भूमिका लपवता आलेली नाही. त्याचा प्रभाव




हा चित्रपटाच्या एकंदरीत मांडणीवर पडला आहे. त्यामुळे कितीही प्रयत्न केले तरी लसनिर्मितीची आव्हानं, शास्त्रज्ञांचे विचार, त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका हे सगळं अलिप्तपणे पाहता येत नाही. ते चित्रण एकांगी होते. आयसीएमआर आणि पुण्याच्या राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेचे (एनआयव्ही) संशोधक, डॉक्टर्स यांचे एकत्रित प्रयत्न, एकमेकांमधील मतभेद, शासकीय लालफितीच्या कारभारात न अडकता वेगाने लसनिर्मिती होण्यासाठी केलेली खटपट, या प्रक्रियेत दिवसरात्र गुंतलेल्यांचे पणाला लागलेले वैयक्तिक आयुष्य हा सगळा भाग समजून घेण्यासारखा आहे. त्यामुळेच हा चित्रपट महत्त्वाचा ठरतो. मात्र यातला फार मोठा भाग हा माध्यमांनी कशा पद्धतीने यात राजकारण केले आणि त्याकडे दुर्लक्ष करत सरकारने कशा पद्धतीने लसनिर्मितीचे आव्हान पूर्ण केले हे मांडण्यात गेला आहे. अगदी शेवटपर्यंत चित्रपट या विषयावर भाष्य करण्याची संधी सोडत नाही. पावणेतीन तास कालावधी असलेल्या या चित्रपटात लसनिर्मितीमागे नेमका कशा पद्धतीने विचार केला गेला या तपशिलात जाण्याचा प्रयत्न केला गेलेला नाही. अनेकदा डॉ. बलराम, डॉ. प्रिया अब्राहम, डॉ. निवेदिता गुप्ता, डॉ. रमण गंगाखेडकर या महत्त्वाच्या व्यक्ती आणि त्यांची टेबलावरची चर्चा, वादविवाद इथेच आपण अडकून पडतो.कथा आणि मांडणीतील हे कच्चे दुवे कसलेल्या कलाकारांच्या अभिनयामुळे काही प्रमाणात सांधले गेले आहेत. डॉ. बलराम यांची भूमिका अभिनेते नाना पाटेकर यांनी केली आहे. नानांना खूप मोठ्या कालावधीनंतर चित्रपटात तेही चरित्र व्यक्तिरेखा साकारताना पाहणं ही पर्वणी आहे. या चित्रपटातील प्रत्येक स्त्री व्यक्तिरेखा त्या त्या अभिनेत्रीने उत्तम निभावली आहे. डॉ. प्रिया यांच्या भूमिकेसाठी पल्लवी जोशी यांनी पकडलेला हेल, देहबोली अप्रतिम आहे. आई म्हणून असलेली जबाबदारी आणि शास्त्रज्ञ म्हणून असलेलं देशाप्रति कर्तव्य या द्वंद्वात अडकलेल्या डॉ. निवेदिता यांच्या मनातील आंदोलनं आणि तरीही आपल्या विचारांवर ठाम राहणं, त्यांचा करारीपणा या छटा अभिनेत्री गिरिजा ओकने खूप सहज सुंदर पद्धतीने रंगवल्या आहेत. निवेदिता भट्टाचार्य, सप्तमी गौडा या सगळ्याच कलाकारांनी आपापल्या भूमिका प्रामाणिकपणे केल्या आहेत. एक वेगळा आणि तितकाच महत्त्वाचा विषय इतर कुठल्याही नाट्याचा, कुठल्याही एका बाजूचा मुलामा न देता हे देशी लसनिर्मितीचं युद्ध मांडलं असतं तर ते अधिक प्रभावी ठरलं असतं.

# सत्यशोधक समाजाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना, जनतेला जागृत करण्यासाठी २४ सप्टेंबर २०२३ ला फुले दाम्पत्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला १५० वर्षे पूर्ण झालीत. त्यानिमित्ताने शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा करताना 'सत्यशोधक समाजाचा कृतीशील कार्यक्रम आपली भूमिका, कार्य आणि कर्तव्य.' या विषयावर प्रासंगिकता लक्षात घेऊन या ज्वलंत विषयावर बामसेफ अंतर्गत फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने जनसंपर्क कार्यालय द्वारा बी. बी. मेश्राम, साकेत नगर (पेठे नगर), छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जेणेकरून फुले शाहू आंबेडकराईट चळवळीचे संघटनात्मक कार्यात वृद्धी होऊ शकेल.

या कार्यशाळेचे उदघाटन अँड. विलास रामटेके यांनी केले. ते म्हणाले की, सत्य वर्तन केल्यानेच माणसे सुखी होतील. म्हणून समाजातील सत्य शोधून प्रबोधन केले पाहिजे. धर्मशास्त्रातील थोतांडावर चिकित्सा करताना राष्ट्रपिता फुले म्हणतात की, सत्य हीच नीति आणि तोच मानवाचा धर्म होय. याची जाणीव ठेवून मार्गक्रमण करावे.

याप्रसंगी वसंतराव धवसे म्हणाले की, महात्मा फुले यांनी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून, सर्व सुखाचा त्याग करून आपल्यासाठी कार्य केले आहे. डॉ. रमेशचंद्र धनेगावकर म्हणाले की, फुल्यांनी त्या काळात महार मांगासाठी शाळा काढल्यात ही फार मोठी क्रांतीच होती. थॉमस पेन लिखित राईट्स आफ मॅन, एज आफ रिजन या सारख्या महत्वाच्या पुस्तकाचा फुल्यावर फार मोठा प्रभाव होता. लार्ड मेकॉले यांचा फिल्टर डाऊन थेअरीचा सिद्धांत अयशस्वी ठरला. पुढे शिक्षण आयोगाने देशाचे भवितव्य वर्गखोलीत घडत असते असे म्हटले होते मात्र आज खाजगीकरण करून शाळा बंद पाडल्या जात आहेत. ही शोकांतिका दूर करण्यासाठी आपण सामुदायिकरित्या कृती कार्यक्रम ठरविले पाहिजेत. धनराज गोंडाणे म्हणाले की, वैदिक संस्कृतीपासून शोषण सुरू आहे. सत्याचा शोध लावणे हे एक अत्युच्च कार्य आहे. सदाचारी होण्यासाठी सत्य आचरणात आणने आवश्यक आहे. बुद्धत्व प्राप्त करण्यासाठी ध्येय ठरवावे लागेल. जेणेकरून अंतिम सत्य प्राप्त करता येईल. करिता आपण सत्य समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. भिमराव मुजमुले म्हणाले की मनुवादी प्रवृत्तीचा नायनाट करण्यासाठी महिलांचा सहभाग वाढविला पाहिजे. साधू आनंद म्हणाले की, आपण केवळ प्रतिक्रिया देऊन चालणार नाही तर काय क्रिया करायला हवी? हे समजून घेण्यासाठी अशा प्रबोधनात्मक कार्यशाळेला उपस्थित राहिलेच पाहिजे.

प्रमुख वक्ते इंजिनियर महेश निनाळे म्हणाले की, प्रत्येक सत्यशोधकांनी आपण काठावर पास होण्यापुरते किमान ३५% तरी सत्यशोधकीय आहोत काय?असा प्रश्न आपण स्वतः ला विचारला पाहिजे. धर्मकिर्ती महाराज व वाबळे महाराज यांचे वारक-यांच्या भूमिकेतून विचार समजून घेऊया म्हणजे सर्व संत महापुरुष कळतील जेणेकरून सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे घेऊन जाता येईल. विहारे ही चळवळीचे सांस्कृतिक केंद्र व्हायला हवेत. कार्यकर्ता होण्यापूर्वी कर्ता धर्ता व्हायला पाहिजे म्हणजे कार्य करता येईल. भारत हा बौद्ध राष्ट्र आहे. म्हणून दरेकाने दरेकाला दीक्षा दिली पाहिजे.




या कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, समाजातील परिस्थिती लक्षात घेऊन ख्रिश्चन, मुसलमान, मांग, ब्राह्मण यांच्यात मानवीय दृष्टीकोनातून बंधुभाव विकसित केला पाहिजे. हे करण्यासाठी सर्वांना शिक्षण, स्त्री-पुरूष समानता, जाती निर्मूलन, संसाधनाचे फेर वाटप, ज्ञान निर्मिती, धर्म चिकित्सा, आंतरजातीय विवाह यासारख्या कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी केली तर सत्यशोधक समाजाची निर्मिती होऊ शकेल. १८७३ साली लिहिलेला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी निग्रोच्या चळवळीला अर्पण केला होता. यावरून फुल्यांचे कार्य वैश्विक होते. फुल्यांकडे सुवर्ण अलंकार निर्माण करण्यासाठी लागणारे साचे विकण्याची एजन्सी होती. शेतीसाठी ठिबक सिंचनाचे बीजारोपण त्यांनी केले होते. १८८३ मध्ये त्यांनी शेती मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाल्याशिवाय शेती आणि शेतक-यांचे दैन्य संपणार नाही अशी शेतक-यांचा आसूड मध्ये त्यांनी मांडणी केली. विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी स्टायपेंडची योजना सुचविली होती. 'सत्तेवाचून सकळ कळा, झाल्या अवकळा।' हे ज्योती सुत्र समजून घेतले तर राजकारणाची महती लक्षात येते. यावरून फुले उद्योगपती, व्यावसायिक, कंत्राटदार, ग्रंथ निर्माते तर होतेच शिवाय राष्ट्रनिर्माते सुद्धा होते. करिता त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना केली. याची अंमलबजावणी करण्यासाठी एक देश, एक शैक्षणिक अभ्यासक्रम राबविला पाहिजे, असे ज्योतिबा म्हटले होते. त्यासाठी त्यांनी १९ आक्टोबर १८८२ ला हंटर आयोगासमोर निवेदन दिले होते.

या कार्यशाळेला साधू. एस. आनंद, अँड. व्ही. डी. रामटेके, अनंत कुमार खोब्रागडे, भिमराव मुजमुले, अँड. विजय वानखेडे, धनराज गोंडाणे, व्ही. डी. धवसे, इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वांनी विषयाच्या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले आहे. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यशाळेची सांगता झाली.

# पानगाव येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सर्वांगीन विकासाठी पाच कोटी निधी मिळवून देऊ-आ. कराड

लातूर दि.०५- प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जाणाऱ्या पानगाव येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिराची हेमाडपंथी वास्तू पुन्हा निर्माण होणे नाही. त्यामुळे ही वास्तू जतन केली पाहिजे या मंदिराला तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा मिळवून देवू त्याचबरोबर भावीक भक्तांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

आ. रमेशआप्पा कराड यांनी बुधवारी सायंकाळी पानगाव येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास भेट दिली मनोभावे पूजा करून आरती केली. मंदिर परिसरात होणाऱ्या ५० लक्ष रुपयांच्या कामाची माहिती घेऊन पाहणी केली. यावेळी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, लातूर ग्रामीण अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष अँड दशरथ सरवदे, रेणापुर तालुका संगायो अध्यक्ष वसंत करमुडे, जिल्हा भाजपाचे सतीश आंबेकर यांच्यासह पानगाव येथील मंदिर ट्रस्टचे प्रदीप कुलकर्णी, माजी उपसभापती अनंत चव्हाण, माजी सभापती चंद्रचूड चव्हाण, माजी जिप सदस्य



ईश्वर गुडे, सुकेश भंडारे, बांधकाम विभागाचे देवशेटवार यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

पानगावच्या या विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आल्यावर प्रसन्नता आणि अनुभूती मिळते. अंदाजे १३ व्या शतकातील हेमाडपंथी स्थापत्य शैलीतील मंदिराचे जतन झाले पाहीजे. अशा वास्तू पुन्हा निर्माण होणे अशक्य असून मंदिराचा पुनर्विकास झाला पाहीजे, भाविकांना सोयी सुविधा मिळाल्या पाहिजेत असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की या मंदिराला पर्यटन विकासाचा 'ब' दर्जा मिळून सर्वांगीण विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मिळवून देऊ अशी ग्वाही दिली. त्याचबरोबर पानगावकरांनी एकोपा कायम ठेवून गावचा विकास करून घ्यावा असे बोलून दाखविले.

प्रारंभी आ. कराड यांचे मंदिर ट्रस्टच्या वतीने प्रदीप कुलकर्णी यांनी फेटा बांधून मानाचे उपरणे व पुष्पहार घालून स्वागत केले, त्याचबरोबर दत्ता कस्तुरे आणि बाबुराव कस्तुरे यांनी विठ्ठल रुक्मिणीची चांदीची मूर्ती भेट देऊन यथोचित सत्कार केला. प्रदीप कुलकर्णी यांनी प्रास्ताविकातून बांधकामाची माहिती दिली तर चंद्रचूड चव्हाण यांनी मंदिराच्या विकास कामाला मदत करण्याची विनंती केली. याप्रसंगी गोपाळ शेंडगे, भागवत गीते, दत्तात्र्य भंडारे, अमर चव्हाण, वामन संपत्ते, हरिकृष्ण गुरले, गणेश तूरूप, दत्ता आंबेकर, प्रकाश गालफाडे, भागवत गडगिळे, अँड माधव गुडे, गोविंद नरहरे, दिगंबर येडले, संतोष तूरूप, जयराम जाधव, मारुती गालफाडे, शीला आचार्य, योगीराज शिरसाट, वीरेंद्र चव्हाण, अँड. बोराडे, नाथराव गीते, प्रसाद गीते, शिवाजी जाधव, उद्धव बरुळे, अँड किशोर श्रीगिरे, बंडू गुरव, रमेश केंद्रे, राजू भंडारे, ज्ञानेश्वर रामरूळे यांच्यासह मंदिर ट्रस्टचे सदस्य पानगाव येथील ज्येष्ठ नागरिक भाविक भक्त भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आसाममधील ५ आदिवासी मुस्लिमांच्या स्थितीचे सर्वेक्षण

गुवाहाटी : आसाम राज्याच्या ३.५० कोटी लोकसंख्येतील मुस्लिमांचे प्रमाण १.४० कोटींवर गेले आहे. या धर्तीवर राज्यातील ५ मूळ आदिवासी मुस्लिम समाजाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा आढावा घेण्याचा निर्णय हिमंता बिस्वा सरमा सरकारने जाहीर केला आहे. मूळ आदिवासी मुस्लिम समाजाच्या विकासासाठी हे सर्वेक्षण होणार असल्याचे मुख्यमंत्री हिमंता सरमा यांनी सांगितले. गोरिया, मोरिया, देशी, सय्यद आणि जोल्हा या मुस्लिमांतील जातींचा सर्व्हे या निर्णयांतर्गत होईल.राज्य सरकारने जवळपास ८ महिन्यांच्या अवकाशानंतर राज्यात पुन्हा बालविवाहाविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. बालविवाह आणि बहुविवाहासारख्या कुप्रथेचे समर्थन करर्णाया मुस्लिमांच्या मतांची भाजपला गरज नाही. आधुनिक व राष्ट्रीय विचारांचे मुस्लिम भाजपसोबतच आहेत, असे वादग्रस्त विधान नुकतेच सरमा यांनी केले होते. आतापर्यंत १०४० जणांना बालविवाह प्रकरणात अटक करण्यात आली आहे. याआधीच्या पहिल्या टप्प्यात राज्यात सुमारे ३ हजार लोकांना अटक करण्यात आली होती. २ आणि ३ ऑक्टोबरच्या रात्रींत मिळून ९१६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एकूण ७०६ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. अल्पसंख्याक दर्जा काढण्यावर विचार २०११ च्या जनगणनेनुसार, मुस्लिमांची एकूण संख्या १.०६ कोटी होती. ही एकूण लोकसंख्येच्या ३४.२२% होती. त्यात वाढ होऊन सध्या ती ४० टक्क्यांवर गेल्याचा राज्य सरकारचा अंदाज आहे. आसामची लोकसंख्या सुमारे ३.५० कोटी आहे. यात १.४० कोटी मुस्लिम आहेत. जम्मू-काश्मीरनंतर आसाम हे एकूण लोकसंख्येतील मुस्लिमांच्या टक्केवारीच्या हिशेबाने देशात दुसरे मोठे राज्य आहे. आसाममध्ये इस्लाम दुसरा सर्वात मोठा धर्म आणि लोकसंख्येच्या हिशेबानेही सर्वात वेगाने वाढणारा धर्म आहे. खासगी मदरशांची महत्त्वाची भूमिका आहे. राज्यातील ११ जिल्ह्यांत ५२ ते ९९ टक्क्यांपर्यंत मुस्लिम लोकसंख्या आहे. अन्य ८ जिल्ह्यांतून मुस्लिम लोकसंख्ये वेगवान वाढ आहे.

# महिला आरक्षण हा महिलांचा हक्क : प्रियंका गांधी

इंदूर : या वर्षाच्या शेवटी ५ राज्यांच्या विधानसभा निवडणूक होणार आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वीच सत्ताधारी भाजप आणि विरोधी पक्ष काँग्रेसने प्रचारात पूर्ण ताकद लावली आहे. दरम्यान, काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी गुरुवारी मध्यप्रदेशमधील धार येथे सभेला संबोधित केले. यावेळी महिला आरक्षण विधेयक आणि जातनिहाय जनगणनेवरून पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे. त्या म्हणाल्या की, मोदी सरकारने महिला आरक्षण विधेयक हे नवे विधेयक आणले. पण त्यात फसवणूक झाली आहे. हे विधेयक दहा वर्षांनी लागू होईल. महिला आरक्षण हा महिलांचा हक्क आहे. भाजप सरकार कोणतेही उपकार करत नाही, असे त्या म्हणाल्या.

# महाराष्ट्र नव निर्माण सेना जनहित व विधी सेवा, व प्रभुराज प्रतिष्ठान लातूर च्या वतीने नाना नानी उद्यान बचाव करिता स्वाक्षरी मोहीम राबवून मनपाला दिले निवेदन .





लातूरः- दि.५ ऑक्टोबर रोजी कर्मयोगी लोकनेते विलासरावजी दगडोजी देशमुख (नाना नानी) पार्क भाडे तत्वावर देण्यात आलेला परिसर रद्द करावे तसेच खाजगी करणाच्या विरोधात स्वाक्षरी मोहीम द्वारे नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला......

विलासरावजी दगडोजीराव देशमुख (नाना नानी )पार्क हे लातूरशहरील मुख्य ठिकाणी असल्याने तेथे नागरिकांना व जेष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी ही संकल्पना निर्माण केली. याचा लाभ लातुर शहरांतील अनेक नागरिक घेत होते.जेष्ठ नागरिकांना हे उद्यान आपलेसे वाटू लागले त्यांचा हक्काचं ठिकाण होते. कांही काळानंतर त्याचे एका कंपनीला खाजगी तत्वावर देण्याचे ठरले असता त्याबाबत नागरिकांनी अनेक वेळा निवेदन व आंदोलन मार्फत विरोध दर्शविला, पण मनपा लातूरने आपला मनमानी कराभार चालू ठेऊन नागरिकांच्या मागणीला दुर्लक्षित केले. यामुळे उद्यानामध्ये अनेक अडचणी येऊ लागल्या जसे की फिरण्यासाठी अपुरे ग्रॉऊंन्ड,जेष्ठ नागरिकांना विसावा घेण्यासाठी अपुरी जागा, जेष्ठ महिला नागरिकांना बसण्याकरिता जागा नसणे, स्वच्छतागृह दुर्गंधी अवस्थेत व तेथे पाण्याची व्यवस्था नसणे, पूर्ण परिसर अस्वच्छता असणे.असे अनेक प्रश्नाबाबत पालिका प्रशासन अपयशी ठरत आहे. या सर्व अडचणी खाजगी कंपनी व मनपा यांच्या समन्वय नसल्याने नागरिकांना सोसावे लागत आहे. या मनमानी केलेल्या खाजगी करणास नागरिकांचा पूर्ण विरोध आहे. खाजगीकरण करून भाडे तत्वावर देण्यात आलेल्या कंपनीचा फायदा नागरिकांना व पालिका प्रशासनाला होत नसून खाजगी कंपनी त्वरित नाना नानी पार्क येथून हलवून मनपा प्रशासनाने स्वतःच्या ताब्यात घ्यावे आणि लातूरतील सर्व नागरिकांना लहानमुलांना मोफत सुरु करावे अशी स्वाक्षरी मोहिमेमार्फत मनपा आयुक्ताना देण्यात येणार आहे. तरी यांची दखल घेऊन आयुक्त साहेबानी भाडे तत्वावर दिलेले खाजगीकण रद्द करावे आणि सर्व नागरिकांना न्याय द्यावे अशी विनंती करण्यात येत असून यावेळी मनसे व प्रभुराज प्रतिष्ठानचे अद्यक्ष अँड.अजय कलशेट्टी, अँड.सुरेश सलगरे , अँड.शिवकुमार बनसोडे,वाय एस. मश्याक, हेमंत वडणे, विलास भुमकर, शिवाप्पा धुळे,युवराज बेल्लूरे,शिवलिंग गुजर,आर.एस. यादव,हुसेन पठाण,शिरीष माळी, सतीश तिवारी,अशोक पंचाक्षरी,विजय वारद, शिवा बदनाळे,सोमनाथ खुदासे,गोविंद कुंचमवाड आदीं मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिडको द्वारे सुश्रुषा चेरीटेबल ट्रस्ट ला दिलेला भुखंड महानगरपालिकेने ताब्यात घ्यावा व त्याठिकाणी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चालु करावे.

सिवुड्स हॉस्पिटल संघर्ष कृती समिती, व सेक्टर ४८ येथील समस्त जनतेच्या वतीने बेमुदत उपोषण लढा आपल्या हक्कासाठी ! हक्काच्या हॉस्पिटलसाठी !!




नवी मुंबई / के. एच. हनवते :- महाराष्ट्र शासनाद्वारे सिडकोची निर्मिती करण्यात आली. आणि सिडकोमार्फत नवी मुंबई शहराच्या विभिन्न क्षेत्रात नागरिकांसाठी वसाहती बनवल्या गेल्या. सिडको स्थापने मागे शासनाचे मूळ उद्दिष्ट हे होते की नवी मुंबईत नवीन वासाहती निर्माण करून नागरिकांना त्यासोबतच शाळा, आरोग्य, मार्केट यांसारख्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे. त्याच अनुषंगाने सिवुडस विभागात वसाहती निर्माण होत असताना मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलसाठी एका भूखंडाचे टेंडर काढण्यात आले. आणि सदर टेंडर सुश्रुषा चॅरिटेबल ट्रस्ट ला देण्यात आले. आणि हॉस्पिटल उभारणीसाठी ५ वर्षाचा कालावधी सदर ट्रस्टला देण्यात आला. परंतु आज २०२३ पर्यंत सदर ठिकाणी भव्य दिव्य उभी आसलेल्या इमारतीत हॉस्पिटल सुरू होऊ शकले नाही. सदर भुखंडातुन मोठा नफा भविष्यात मिळेल ह्याकरीता ह्या विभागातील नागरिकांची गेल्या अनेक वर्षापासून फसवणूक करण्यात येत आहे. सिडको अधिकाऱ्यांना मॅनेज करून फक्त एक्स्टेंशन मिळविण्याचे काम सदर संस्था करीत आहे. आताही आपण अशीच वाट पाहत बसलो तर सदर हॉस्पिटल पुढील ५ वर्षात देखील सुरू होणार नाही. याकरिता सदर भूखंड नवी मुंबई महानगर पालिकेला देऊन त्याठिकाणी सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करणे हा उत्तम पर्याय ठरू शकतो . तरी सदर भूखंड सुश्रुषा ट्रस्ट कडून काढून घेऊन नवी मुंबई महानगर पालिकेला मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. ही मागणी जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे. तरी सिवुडस विभागातील प्रत्येक नागरिकांनी ह्या उपोषणात सहभागी व्हावे अशी विनंती आपणास करण्यात येत आहे.

आपले कृपाभिलाशी.

मा. नगरसेवक विशाल राजन डोळस सिवुड्स हॉस्पिटल संघर्ष कृती समिती बी डी बागुल साहेब, बापूसाहेब धडस, अशोक जी कुंडे, हरिश्चंद्रजी पवार, हरिश्चंद्र फलके, गुलाबराव ठोंबरे, तुकाराम पाटील, अरविंद थोरात, शंकर पाटील, तानाजी कवडे, अभिमन्यू चव्हाण, सचिन शिंदे, भीमराव पवार, अमोल नरसुळे, धनंजय निंबाळकर नामदेव आळवेकर, विजय तळेकर, वेदांत शिर्के, भगवान शेलार, शंकर सोनावणे, परशुराम ठाकूर, गौतम काटे, आबा कांबळे, प्रमोद भाऊ उबाळे, अल्काताई वणवे, तबस्सुम शेख, निता जाधव, मीनल जाधव, रोशनी पवार, सुवर्णा उबाळे, अक्षय जाधव, श्रीकांत पवार, संजय बांगर, रामनाथ जाधव, संजय गंगावणे, रोहित फाले, असिफ पटेल, सतीश पवार, आनंद कुंभार, विनोद कोटिया, विनोद बोरा, प्रथमेश तांबडे, अविनाश भिसे, अक्षय मुसळे, संदीप कदम, रमल मोरे, अनिल सोरटे, तुषार मेढेकर, सागर जाधव, दिनेश म्हात्रे, शैलेश गावडे, विशाल वानखेडे, रोहन चव्हाण, चेतन निंबाळकर,

# जय श्रीराम बोलण्यास नकार दिल्याने सिद्धार्थ अंगुरे यांस परप्रांतीय तरुणाकडून बेदम मारहाण ॲट्रॉसिटी कायदा अंतर्गत गुन्हा नोंद.



मुंबई/शहामत शेख.: सिद्धार्थ अंगुरे हा तरुण मंगळवार दि.२५ सप्टे रोजी मध्यरात्री१२.३० दरम्यान कामावर घरी परतत असताना काही परप्रांतीय चार –पाच तरुणांनी कांदिवली पूर्व लोखंडवाला या ठिकाणी रस्त्यात अडवून जय श्रीराम बोलअसे जबरदस्ती जातीवाचक शिव्यागाळ करत मारहाण केली. या पीडित तरुणाने कुरार पोलीस ठाणे उपस्थित पोलीस अधिकाऱ्याला ही बाब निदर्शनास आणून दिली.सुरुवातीस पोलिसांनी व्यवस्थित फिर्याद न घेता गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ केले.ही सविस्तर माहिती स्थानिक असंख्य समाज बांधवाना कळताच एकत्र येत वेळीच गुन्हा नोंद करण्याचे भाग पाडले. भारतीय दंड संहिता ३४१,३२३,५०४,५०६,३४, कलमांतर्गत सुरुवातीस गुन्हा नोंद केला मंगळवार दिनांक (०४ऑक्टो) रोजी वंचित बहुजन आघाडी युवा मुंबई अध्यक्ष परमेश्वर रणसुर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वसाधारण रुग्णालय येथे भेट देऊन पीडित सिद्धार्थ अँगुरे यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच दिनांक ०६ ऑक्टोंबर रोजी पोलीस उपायुक्त कार्यालय परिमंडळ १२ येथे मोर्चाचे आयोजन करण्याचे सूचना कार्यकर्त्यांना दिले,पोलीस प्रशासनाने याची वेळीच दखल घेत भारतीय दंड संहिता ५०६ ( २) प्रमाणे अनुसूचित जाती व जमाती प्रतिबंधक अधिनियम ३(१)( ी)(ी) या कलमात वाढ करत ट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा नोंद केला. अधिक तपास पोलीस करत आहे याप्रसंगी उत्तर मुंबई जिल्हा युवा अध्यक्ष अजय रोकडे,महासचिव रफिक खान कांदिवली पूर्व तालुकाध्यक्ष विकास शिरसाट,वंचित बहुजन आघाडी मुंबई युवा सचिव तेजस जमनिक ,उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष प्रकाश अहिरे ,अंकुश जाधव,धनराज ओटले, नित्यानंद हिरवे,बौद्धचार्य भाऊराव काळे, गणेश नवगिरे,अरविंद सूर्यवंशी अभिषेक वाकोडे ,जिल्हा महासचिव,ॲड.अनिल ढवळे,उत्तर मुंबई जिल्हा युवा सचिव व पत्रकार शहामत शेख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भारतीय मराठा महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी ॲड. स्वातीताई फडतरे यांची निवड




नवी मुंबई / के.एच. हनवते :- भारतीय मराठा महासंघाच्या महाराष्ट्र महिला प्रदेश सचिव पदी नवी मुंबईच्या समाजसेविका अँड. स्वाती ताई फडतरे, नोटरी ( भारत सरकार ) नवी मुंबईकर या गेली अनेक वर्षा पासुन समाजउपयोगी कार्य करीत आहेत, त्यांच्या या कार्याची दखल घेऊन भारतीय मराठा महासंघाने अँड. स्वातीताई फडतरे यांची महाराष्ट्र महिला प्रदेश सचिव पदी निवड, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री. विनय भोईटे व महाराष्ट्र प्रदेश महीला अध्यक्षा सौ. श्रेया तटकरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन करण्यात आली व त्यांना पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रवक्ते राजन गावंड साहेब, ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रसाद जी घोरपडे, नवी मुंबई शहर संघटक मयूर जी चव्हाण, हे उपस्थित होते. अँड. स्वातीताई फडतरे यांनीही शिवरायांना प्रेरित असे काम घडवून आणू असे आश्वासन दिले.

# संभाजी कॉलेजमध्ये पालक व माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन

मुरुड /महेंद्र आल्टे : येथील संभाजी कॉलेजमध्ये आयक्यूएससी विभागाच्या व पालक व माजी विद्यार्थी मेळावा समितीच्या वतीने दि. ०७/१०/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पालक व माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरील मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. संतोष राऊत, सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास मंत्रालय, मुंबई यांची उपस्थिती राहणार आहे. तर प्रा. डॉ . ज्ञानेश्वर चौधरी, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे. तसेच मा.श्री. बी. एस. (दादा) पटाडे, अध्यक्ष, समाज जागृती शिक्षण संस्था मुरुड, मा. ॲड. व्ही. वाय. पाटील, सचिव, समाज जागृती शिक्षण संस्था मुरुड, मा.श्री. विकास गाढवे, अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघटना, मा.श्री.मनोज जोशी, माजी विद्यार्थी, मा.श्री. संजय नाडे, पालक शिक्षक संघ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी पालक व माजी विद्यार्थी मेळाव्यास जास्तीत जास्त पालकांनी व माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कॉलेजचे प्र. प्राचार्य प्रा. डॉ. पिडगे ए.के, पालक व माजी विद्यार्थी मेळावा समितीचे प्रमुख प्रा.पैठणकर एन .एल. तसेच प्रा. डॉ.आंबाड आर. एफ., प्रा. सौ.महाजन पी. बी., प्रा .सहालुगडे आदींनी केले आहे.

# अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होताच अहवाल सादर करा : सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे



पुणे : ( प्रतिनिधी ) अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होताच पोलीस विभागाने तातडीने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण पुणे व नागरी हक्क संरक्षण शाखा यांना अहवाल सादर करावा, अशा सूचना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विशाल लोंढे यांनी केल्या आहेत. पुणे जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीची बैठक नुकतीच उपजिल्हाधिकारी अस्मिता मोरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. त्या वेळी सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे बोलत होते. बैठकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबत आढावा घेण्यात आला. कागदपत्रां अभावी अर्थसहाय्य प्रलंबित असलेल्या प्रकरणांत संबंधित विभागांनी तात्काळ कार्यवाही करून सदर कागदपत्रे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयात उपलब्ध करून देण्याच्या सूचना उपजिल्हाधिकारी अस्मिता मोरे यांनी दिल्या. सदर बैठकीसाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सहाय्यक पोलीस आयुक्त भास्कर डेरे, पुणे ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक युवराज मोहिते, ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी गौतम वाघमारे, पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# पदवी शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी इतर कौशल्ये आत्मसात करावी – मनोज जोशी

मुरुड /महेंद्र आल्टे : पदवीचे शिक्षण घेत असताना मी वर्तमानपत्रे वितरणाचं काम तसेच दूध डेअरीवर वडिलांना मदत आणि जनरल स्टोअर्समध्ये पार्ट टाइम काम या गोष्टी केल्यामुळे मला मार्केटिंगचे कौशल्य प्राप्त झाले. व आज त्याच कौशल्याच्या जोरावर मी आज एक यशस्वी वित्तीय व्यावसिक व प्रशिक्षक म्हणून समाजामध्ये वावरतो आहे. त्याचप्रमाणे आजच्या विद्यार्थ्यांनी देखील पदवी शिक्षण घेत असताना इतर कौशल्ये आत्मसात करावी असे प्रतिपादन मुरुडचे प्रसिद्ध पत्रकार, विमा प्रतिनिधी, वित्तीय सल्लागार, मनोज जोशी यांनी केले. येथील संभाजी महाविद्यालयातील भूगोल विभाग, अंतर्गत गुणवत्ता कक्ष आणि ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भूगोल अभ्यास मंडळ, महाविद्यालयीन ग्रीन क्लबचे उद्घाटन व जागतिक ओझोन दिन या कार्यक्रमा प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, आई–वडिलांच्या ऋणातून मुक्त होता येत नाही म्हणून त्यांना वेळोवेळी आहे त्या परिस्थितीत मदत करण्याचा प्रयत्न करा. विशेषता मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करावा कारण महिला सक्षम असणे ही काळाची गरज बनली आहे त्याकरिता विद्यार्थिनींनी पदवी शिक्षणाबरोबरच इतर कौशल्य आत्मसात करावी असे मत व्यक्त केले. पर्यावरणाचा होत चाललेला ऱ्हास. जागतिक तापमान वाढ, ओझोनचा क्षय आणि वृक्ष लागवडीचे महत्त्व अशा अनेक पैलूवर त्यांनी प्रकाशझोत टाकला. पर्यावरण वाचविण्याकरिता आजच्या विद्यार्थ्यांची तसेच समाजाची खूप मोठी जबाबदारी आहे तरी विद्यार्थ्यांनी या गोष्टीचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंतर्गत गुणवत्ता कक्ष समन्वयक प्रा. एम बी गायकवाड होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रास्ताविक करताना प्रोफेसर डॉ .जी एल जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय व भूगोल अभ्यास मंडळाचे कार्य, रूपरेषा व ओझोन दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. डॉ. एच एस वाघमारे यांनी महाविद्यालयीन ग्रीन क्लब, त्याची रूपरेषा त्याचे कार्य विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.




कार्यक्रमाप्रसंगी भूगोल अभ्यास मंडळातील पदाधिकारी, ग्रीन क्लब मधील पदाधिकारी व बी.ए. प्रथम वर्षातील नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते स्वागताचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक प्रा. एम बी गायकवाड यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. जागृती मोलक हिने केले तर आभार कु. अनुराधा क्षीरसागर हिने मानले. कार्यक्रमास प्रा. एस. के. सुतार , प्रा. ए.व्ही. सूर्यवंशी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी– विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी भूगोल विभागातील डॉ. एस एन उबाळे डॉ. जी एल जाधव, विभागप्रमुख डॉ . एच. एस.वाघमारे व विभागातील सर्व विद्यार्थांनी परिश्रम घेतले.

# बीडच्या २४२ गावांमध्ये भीषण पाणीटंचाई ?

बीड : दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणा–या बीड जिल्ह्यात पुढील काही दिवसांत नागरिकांना मोठ्या पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. कारण जिल्ह्यात यंदा अपेक्षित पाऊस झाला नसल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. अशातच बीड जिल्ह्यातल्या २४२ गावांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेष म्हणजे तसा अहवाल वरिष्ठ भू–वैज्ञानिकांनी सरकारकडे सादर केला आहे.बीड जिल्ह्यातील २२६ निरीक्षण विहिरींच्या पाणी पातळीची तपासणी करण्यात आली असून, यामध्ये शून्य ते दोन मीटरपर्यंत घट झाली आहे. त्यामुळे २४२ गावांना मार्च ते मे महिन्यामध्ये भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता वरिष्ठ भू–वैज्ञानिकांनी वर्तवली आहे. यासंदर्भातला अहवाल भू–वैज्ञानिकांनी जिल्हा प्रशासन आणि राज्य सरकारला पाठवला आहे. राज्य शासनाच्या आदेशानुसार सप्टेंबर महिन्यामध्ये बीड जिल्ह्यातील २२६ निरीक्षण विहिरींच्या पाण्याची तपासणी करण्यात आली. यामध्ये पाणी पातळीमध्ये घट झाली असून, जिल्ह्यातल्या आठ तालुक्यांतील २४२ गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार असल्याचे समोर आले आहे.बीड जिल्ह्यामध्ये अद्यापही मोठा पाऊस न झाल्याने धरणामध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा आलेला नाही. काही प्रकल्प तर अक्षरश: कोरडेठाक पडले आहेत. सप्टेंबरअखेरीस जिल्ह्यात ८० टक्के एवढीच पावसाची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे मार्च आणि मे महिन्यामध्ये पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.

# दिपावलीनिमित्त खास वृद्धांसाठी साईप्रसाद अन्नपूर्णा सेवा योजना.चेअरमन डॉ गोविंदराव माकणे यांचा स्तुत्य उपक्रम.



चाकूर:(सुशिल वाघमारे) 'जे का रंजले गांजले,त्यासी म्हणे जो आपुले' या उक्ती प्रमाणे सामाजिक उत्तरदायित्व घेऊन कार्य करीत असणारे चाकूर विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन डॉ.गोविंदराव माकणे यांनी चाकूर शहरातील वंचित, निराधार, अबलावृध्द लोकांना साईप्रसाद अन्नपूर्णा सेवा योजनाच्या माध्यमातून दररोज मोफत भोजनाची व्यवस्था केली आहे. समाजात अनेक वृध्द लोकांना त्यांची मुले सांभाळत नाहीत. वृध्दपकाळात स्वतः ची कामे स्वताला करता येत नाहीत. अपंग,आजारी निराधार लोकांना भोजन मिळत नसल्यामुळे त्यांचे प्रचंड हाल होत आहेत. हीच काळाची गरज ओळखून डॉ. गोविंदराव माकणे यांनी चाकूर शहरातील वृध्द निराधार लोकांना दोन वेळच्या भरपेट भोजनाची सोय केली आहे. दिनांक १५ /१० /२०२३ पासून ते दिनांक १०/११/२०२३ पर्यत नाव नोंदणी करण्यात येणार आहे. लाभार्थींना ओळखपत्र देण्यात येईल. अन्नसेवा ही दीपावलीच्या पाडव्या पासून दररोज सकाळी १० ते११ या वेळेत व सायंकाळी ७ ते८ या वेळेत सोसायटी येथे केली आहे. ज्यांना येथे येण्यासाठी अडचण आहे. अशा वृध्दांना घरपोच डबा त्यांचे नातेवाईक अथवा सहकारी हे ओळखपत्र दाखवून त्यांना घरपोच करू शकतील. तरी या साठी गरजू लोकांनी सुधाकरराव लोहारे मो. ७७०९०९७९३४ यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदणी करावे.असे आवाहन चेअरमन डॉ.गोविंदराव माकणे यांनी केले आहे.

# चिमुकल्या रिषभच्या खाऊची रक्कम ॲड. बाळासाहेब आंबेडकराकडे सुपूर्द



लातूर :- लातूर शहरातील विक्रम नगर येथील रिषभ सतीश कांबळे या पाचवर्षीय चिमुकल्याने आपला खाऊसाठी जमा केलेली खाऊची रक्कम वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्याकडे सुपूर्द केला. बालपणातील त्याच्या या समाजशील मनाचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी कौतुक केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी त्यांचे नातू ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यात वंचित बहुजन आघाडीच्यारूपाने एक परिवर्तनाची लाट निर्माण झाली आहे. या निमित्ताने ०२ ऑक्टोबर २०२३ रोजी लातुरात आयोजित परिवर्तन सभेला मार्गदर्शन करण्यासाठी ॲड. प्रकाश आंबेडकर लातूरात आले होते. यावेळी त्याने त्यांची भेट घेतली. रिषभचे पिता सतीश कांबळे आणि संपूर्ण परिवार बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याने प्रेरित होऊन या लढ्यात सहभागी असल्याने पाच वर्षीय रिषभच्या मनात या भावना निर्माण झाल्याचे बोलले जात असून बालपणीच त्याच्या समाजाप्रती असलेल्या भावनांबद्दल डॉ. अंजलीताई आंबेडकर, प्रबुद्ध भारत समूह यांनी सर्वांनी कौतुक केले आहे. तसेच त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE